# महात्मा गांधी विद्यामंदिर मालेगांव कॅम्प (नाशिक)

## नियुक्ती आदेश

जा. क्र. EST/STF/२००१/९४-९५

दिनांक : ४.८.१९९४

प्रति,

श्री. वाकळे रघुनाथ नामदेव, एम.ए.बी.+ हिंदी (एस.सी.)
मु.पो. मळगांव (नागुजीचे)
ता. मालेगांव, जि. नाशिक.

आपले कडिल दि. १०.०४.१९९४ च्या अर्जान्वये कळविण्यात येते की आपली हिंदी विषयाचे व्याख्याते म्हणून संस्थेने संचलित केलेल्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, हरसुल, ता. पेठ, जि. नाशिक (विना अनुदान तत्वावर) येथे रुपये तासिका तत्वावर खात्याचे नियमाप्रमाणे या वेतनश्रेणीत दि. 9 AUG 1994 पासून नियुक्ति करण्यात येत आहे.

१) आपली नियुक्ती ही खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

(अ) — ~~वर्षाच्या परीविक्षा कालावधी साठी.~~

(ब) दि. — ~~पासून दि~~ - ~~पर्यन्त~~ ~~यांचे रजेच्या कालावधीसाठी.~~

(क) फक्त शैक्षणिक वर्ष १९९४-९५ अखेर पर्यन्त.

आपल्या नोकरीचा उपरोक्त कालावधी संपल्यानंतर कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय आपली सेवा समाप्त होईल.

२) सदरची नेमणूक ही पुणे विद्यापीठ/शिक्षण खाते, महाराष्ट्र शासन यांचे अंतीम मंजुरीच्या अटीवर करण्यात येत आहे. त्यांची मान्यता न मिळाल्यास आपणांस काम केलेल्या मुदतीचा पगार दिला जाणार नाही. अगर आपली कोणतीही तक्रार मान्य केली जाणार नाही.

३) आपणांस संस्थेकडून कायम नियुक्ती आदेश (Confirmation Order) दिल्यानंतरच आपली सेवा स्थायी समजण्यात येईल.

४) आपल्या नोकरीच्या अटी आणि सेवेच्या शर्ती ह्या पुणे विद्यापीठ/ महाराष्ट्र शासन यांचे कडील नियम/ अधिनियम इत्यादी प्रमाणे राहतील.

५) पुणे विद्यापीठ/महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी मंजूर केल्याप्रमाणे आपणांस स्थानिक पुरक भत्ता, घरभाडे भत्ता व महागाई भत्ता इत्यादी मिळण्याचा हक्क असेल.

६) या नियुक्ती आदेशाची पोहच द्यावी आणि सदर आदेश मिळाल्याच्या दिवसापासून ५ दिवसाचे आत आपण कामावर रुजू न झाल्यास सदर नियुक्ती आदेश रद्द समजण्यात येईल.

७) पदावर रुजू झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत आपणांस डॉ. पां.डो.जोशी, म.गा.पथ, नाशिक. यांच्याकडून वैद्यकीय तपासणी करून घ्यावी लागेल. ज्या डॉक्टरांचे नाव वर उल्लेखिलेले आहे त्यांच्याकडून शारीरिक पात्रता प्रमाणपत्र मिळण्याच्या शर्तीवर आपली नियुक्ती करण्यात येत आहे.

८) संस्थेने संचलित केलेल्या इतर महाविद्यालयामध्ये बदली होऊ शकेल.

९) मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाल्यास आपली नियुक्ती रद्द होऊ शकेल.

जनरल सेक्रेटरी,
महात्मा गांधी विद्यामंदीर
मालेगांव कॅम्प जि. नाशिक

प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

१) म.प्राचार्य, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, हरसुल.

२) म. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे-७.

टीप : रुजू होण्यापूर्वी म. प्राचार्य यांनी संबंधीत सेवकाची जन्म तारीख व शैक्षणिक लायकी संबंधीचे सर्व कागदपत्र पाहून ते बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी.

ATTESTED on 1-1-15